ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २० | पुणें, बुधवार तारीख १५ सप्टेंबर, १९५४ | अंक ३६

## विविध माहिती

**पिंपरी येथील पेनिसिलीनचा कारखाना**—पुण्याजवळ पिंपरी येथें उभारण्यांत येत असलेला पेनिसिलीनचा कारखाना पूर्ण होत आला असून तो १९५५ च्या जानेवारीपासून सुरू होईल, असें समजतें. आग्नेय आशिआंतील पेनिसिलीनचा हा सर्वांत मोठा कारखाना होईल. कारखान्याचें आवार २० एकरांचें आहे आणि तो उभारण्यासाठी सुमारें १॥ कोटी रुपये खर्च येईल.

**अंदमान बेटांत ७ दीपगृहें बांधणार**—अंदमान बेटांत ७ नवीं दीपगृहें बांधण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. सर्व दीपगृहांना मिळून सुमारें ७० लाख रुपये खर्च येईल. सध्यां पोर्ट ब्लेअरला उपयोगी पडण्यासारखें एक तात्पुरतें दीपगृह बांधण्यांत येणार असून नवी अद्यावत् यंत्रसामुग्री हातीं आल्यावर कायमच्या दीपगृहांचें काम सुरू होणार आहे.

**भारत—युगोस्लाव्हिआ ह्यांच्या दरम्यान वहातूक**—भारत आणि युगोस्लाव्हिआ ह्यांच्या दरम्यान मालाची व प्रवाशांची वहातूक करणारी बोटींची ये-जा सुरू झाली आहे. अशी वहातूक करणारीं ५६ जहाजें सध्यां भारत—युगोस्लाव्हिआ मार्गावर प्रवास करीत असतात. युगोस्लाव्हिआचे सहा विद्यार्थी शांतिनिकेतन येथें शिकण्यासाठी भारतांत आले आहेत.

**राजस्थानमधील विकासाचीं कामें**—नॅशनल एक्सटेन्शन सर्व्हिस योजनेप्रमाणें राजस्थानांत गेल्या महिन्यांत ८ तळीं आणि २६३ विहिरी खोदण्यांत आल्या. त्याशिवाय शाळांसाठी ११ इमारती बांधण्यांत आल्या. बुंदी जवळ एक पाटबंधाऱ्याचें काम पूर्ण करण्याचें राजस्थान सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी ६·९२ लाख रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.

**ब्रिटनला गिऱ्हाईक पाहिजे**—ब्रिटनमधील एका कारखान्याकडे ५,००० टन वजनाच्या तांब्याच्या तारेची मागणी रशिआनें नोंदविली आहे. ह्या तारा विजेच्या वहनासाठी रशिआला पाहिजे आहेत. रशिआला तांब्याच्या वस्तु विकण्यावर प. युरोपांतील सरकारांनीं निर्बंध घातले होते. पण आतां ते ढिले करण्यांत आले आहेत. निर्बंध सैल करण्यांत आल्याबरोबर नोंदविण्यांत आलेली ही पहिलीच मागणी आहे.

**भूदान यज्ञाचें यश**—भारतामधील भूदान यज्ञाची माहिती 'भूमिपत्र' ह्या नियतकालिकांत देण्यांत येत असते. गेल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत एकूण ३४,५०.६८९ एकर जमीन मिळविण्यांत आली. महाराष्ट्रांतून १५,४८० एकर जमिनीचें दान मिळविण्यांत आलें. ७२,६९४ एकर जमिनीची वांटणी करण्यांत आली. ही जमीन २१,२९८ शेतकरी कुटुंबांना आणि जमिनीविरहित असलेल्या शेतमजुरांना वांटण्यांत आली.

**विद्यार्थ्यांची देवाण-घेवाण**—भारत व चीन ह्यांच्या दरम्यान विद्यार्थ्यांची देवाण-घेवाण करण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे, असें समजतें. दोन्ही देशांनीं परस्परांच्या शिक्षणसंस्थांत आपले विद्यार्थी शिक्षण घेण्याकरतां पाठवावे म्हणून सध्या चिनी सरकारशीं वाटाघाटी चालू आहेत.

**गलिच्छ वस्त्यांची सुधारणा**—मुंबई, अहमदाबाद आणि पुणें ह्या शहरांतील गलिच्छ वस्तींच्या भागांची सुधारणा करण्यासाठी ११·९ कोटी रुपये खर्च करण्याची एक योजना नियोजन समितीनें तयार केली असल्याचें समजतें. वरील रकमेपैकी ४.४३ कोटी रुपये कमी उत्पन्न असलेल्या लोकांच्यासाठी घरें बांधण्यावर खर्च करण्यांत येणार आहेत.

**उत्तर-प्रदेशांतील रेल्वे-रस्ता**—उत्तर-प्रदेशांतील उनाव माधव-गंज रेल्वे रस्ता युद्धाच्या वेळीं बंद करण्यांत आला होता व त्यावरील रूळ व इतर सामान दुसरीकडे पाठविण्यांत आलें होतें. हा रेल्वे-रस्ता ६२ मैल लांबीचा होता. आतां हा रस्ता पुन्हा चालू करण्यांत आला आहे.

**पाकिस्तानची तांदुळाची निर्यात**—पाकिस्ताननें फिलिपाइन्स सरकारशीं करार करून ३०,००० टन तांदूळ त्या देशाला निर्यात करण्याचें कबूल केलें आहे. फिलिपाइन्सच्या कांहीं भागांत अवर्षण झाल्यामुळें भाताचें पीक मोठ्या प्रमाणावर बुडालें. त्यामुळें शक्य तितका तांदूळ तांतडीनें आयात करण्याची गरज फिलिपाइन्सच्या सरकारला वाटत आहे.

**रशिया-युगोस्लाव्हिआ व्यापार?**— युगोस्लाव्हिआंतील कारखान्यांच्या चालकांशीं बोलणीं करण्याकरतां रशिआचें सातजणांचें प्रतिनिधि मंडळ बेलग्रेडला गेलें आहे. १९५० सालीं कॉमिन्फॉर्म ह्या कम्युनिस्ट आंतरराष्ट्रीय संघटनेचे युगोस्लाव्हिआशीं बिनसलें होतें व त्यानंतर रशिआ व युगोस्लाव्हिआ ह्यांच्यांतील व्यापारसुद्धां बंद पडला होता.

**बोट कंपनीला सरकारचें कर्ज**—एस. एस. रॉक्सेन ह्या नांवाची एक नवीन वहातुकीची बोट घेण्यासाठी भारतीय सरकारनें भारत—लाइन्स लि. ह्या कंपनीला बोटीच्या किंमतीच्या ७५ टक्के कर्ज देण्याचें ठरविलें आहे. बोटीचें वजन २३,३२१ टन असून ती स्वीडनमध्यें बनविलेली आहे. ही बोट इराणचें आखात व भारत ह्या मार्गावर वहातूक करणार आहे.

**पुरापासून बचाव करण्याच्या योजना**—प. बंगालमधील जलपैगुरी आणि कुचबिहार ह्या जिल्ह्यांचें पुरापासून संरक्षण करण्यासाठी राज्य-सरकारनें योजना तयार केल्या आहेत. ह्या योजनांसाठी २,८५,००,००० रुपये खर्च येईल. ह्याशिवाय उत्तर बंगालमधील इतर जिल्ह्यांच्या रक्षणासाठीहि कार्यक्रम आखण्यांत आला आहे.

**पूरग्रस्तांना मदत**—उत्तर बंगालमधील पुरामुळें निराश्रित झालेल्या लोकांच्या मदतीसाठी प. बंगाल सरकारनें १० कोटी रुपयांची रक्कम खर्च करण्याचें ठरविलें आहे, अशी माहिती राज्याच्या विधिमंडळांत अधिकृत रीत्या सांगण्यांत आली.

**लोकरीच्या विणकामाची स्पर्धा**—नवी दिल्ली येथें लोकरीच्या विणकामाची एक स्पर्धा भरविण्यांत येणार असल्याचें इंटरनॅशनल वूल सेक्रेटरिएट ह्या संस्थेनें जाहीर केलें आहे. पुढील फेब्रुआरी महिन्यांत एक खास प्रदर्शन भरविण्यांत येणार असल्याचेंहि समजतें.

**एलिझाबेथ राणी दिल्ली प्रदर्शनांत तिकिटें मांडणार**—हिंदी पोस्टाच्या तिकिटांचा शतसांवत्सरिक उत्सव दिल्ली येथें १ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. त्याप्रीत्यर्थ भरविण्यांत यावयाच्या प्रदर्शनासाठी ६५ देशांनीं आपलीं तिकिटें पाठविलीं आहेत. ग्रेटब्रिटनची राणी एलिझाबेथ ह्यांच्या संग्रहांतील तिकिटें मांडण्यासाठीं त्यांचा क्युरेटर ऑफ स्टॅम्प्स मुद्दाम दिल्लीस येणार आहे.

**फिनॅन्स कॉर्पोरेशननें दिलेलीं कर्जें**—मध्यवर्ती सरकारनें इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन केल्यापासून कॉर्पोरेशननें १३७ उद्योगधंद्यांना मिळून २१ कोटी रुपयांचीं कर्जें मंजूर केलीं. त्यापैकीं १३ कोटी रुपयांचीं कर्जें उद्योगधंद्यांच्या हवालीं करण्यांत आलीं आहेत.

**हातमाग बोर्डाची पुनर्घटना**—१९५२ च्या ऑक्टोबरमध्यें स्थापन करण्यांत आलेल्या अखिल भारतीय हातमाग–बोर्डाची भारतीय सरकारनें पुनर्घटना केली आहे. नवीन बोर्डांत एकूण ३५ सभासद असतील. मुंबई राज्याचे टेक्स्टाइल कमिशनर बोर्डाचे अध्यक्ष राहतील.

**हैड्रोजनच्या अणुचा उद्योगधंद्यासाठीं उपयोग**—हैड्रोजनच्या अणूच्या स्फोटाचा उपयोग करून उद्योगधंद्यांना लागणारी औद्योगिक शक्ति निर्माण करण्याचा प्रयत्न सोव्हिएट शास्त्रज्ञांनीं चालविला आहे असें समजतें. स्फोटामुळें होणाऱ्या प्रत्याघाताच्या वेगावर नियंत्रण कसें ठेवावें, हाच मुख्य प्रश्न असून तो सोडविण्याच्या कामीं ते यशस्वी होत आहेत.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

## “ पण लक्षांत कोण घेतो ”

**पुढील वर्षीं दहा टक्के नफा सिंडिकेट देईल**

**हा साधा हिशेब**

**दहा हजारांचे शेअर असलेल्या भागीदारानें सांगितला तो**

**१९५२–५३ च्या हंगामांत साखरेच्या दर पोत्यामागें सरकारनें वाढविलेली पावणे तीन रुपये साखर जकात १९५३–५४ च्या हंगामांत सरकारनें कमी केली आहे.**

**दहा (१०) टक्के नफा देण्याला सिंडिकेटला २,६०,००० रुपये लागतात.**

**एकट्या कमी झालेल्या साखर–जकातींतून सिंडिकेटला**

**दहा (१०) टक्के नफा**

**देतां येईल हें भागीदारांनीं लक्षांत घ्यावयास पाहिजे.**

## ठेवींच्या व्याजाचे दर

★ मुदत एक वर्ष — व्याज ६ (सहा) टक्के.

★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ (सात) टक्के.

★ मुदत पांच वर्षें — व्याज ७॥ (साडेसात) टक्के.

ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.
दि. ९–९–१९५४

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स्.

# अर्थ

बुधवार, ता. १५ सप्टेंबर, १९५४



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## इंडस्ट्रिअल फिनान्स कॉर्पोरेशनचा अहवाल

इंडस्ट्रिअल फिनान्स कॉर्पोरेशनचा सहावा वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, तो कॉर्पोरेशनच्या आतांपर्यंतच्या सर्व अहवालांपेक्षा विस्तृत असून त्यांत भरपूर तपशील देण्यांत आलेला आहे. कॉर्पोरेशनच्या कारभारासंबंधीं चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या शिफारशीप्रमाणें, चेअरमनची जागा आतां पगारी करण्यांत आली असून, व्यवस्थेमध्येंहि बऱ्याच सुधारणा करण्यांत आल्या आहेत. कॉर्पोरेशननें ज्या कंपन्यांना कर्जें दिलीं, त्या सर्वांची पूर्ण यादी देण्यांत आली असून, कर्जें कशासाठी दिलीं त्याचाहि खुलासा प्रसिद्ध करण्यांत आला आहे. उद्योगधंद्यांना अनेक प्रकारच्या कारणांसाठी कर्जें देण्यांत आलीं आहेत व त्यामुळें कारखान्यांची उत्पादनशक्ति वाढली आहे, हें निश्चित. फक्त एकच कारखाना आतांपर्यंत स्वतःकडे चालविण्यासाठी घेणें कॉर्पोरेशनला जरूर झालें आहे. ज्या विभागांत औद्योगिक विकास आधींच झालेला आहे, अशांतील कारखान्यांनाच कॉर्पोरेशनचा अधिक फायदा झाला आहे व तें स्वाभाविकहि आहे. कर्ज देण्यास लायक असे अर्ज इतर ठिकाणांहून पुरेसे येतच नसले पाहिजेत. सर्व लायक अर्जांस कर्ज मंजूर करतां येण्याइतपत कॉर्पोरेशनजवळ पैसा असल्यानें, मागासलेल्या विभागांना प्राधान्य देण्याचा आग्रह धरण्याचें कारणच पडलेलें नाहीं.

इं. फा. कॉर्पोरेशननें स्थापनेपासून आतांपर्यंत १३७ कारखान्यांना २१ कोटी रुपयांचीं कर्जें मंजूर केलेलीं असून त्यापैकीं १३ कोटी रुपयांचीं कर्जें प्रत्यक्ष उपलब्ध करून देण्यांत आलेलीं आहेत. ३० जून, १९५४ अखेर संपलेल्या वर्षी कॉर्पोरेशननें घेतलेल्या रकमांवर २५·१९ लक्ष रु. व्याज दिलें, व्यवस्थेसाठी ५·५० लक्ष रु. खर्च केले, ५ लक्ष रु. संशयित कर्जासाठी रिझर्व्हमध्यें टाकले, आणि १७·१८ लक्ष रु. नफा मिळविला. १० लक्ष रु. करासाठी तरतूद म्हणून बाजूला काढल्यावर हमीचें २½% डिव्हिडंड देण्यास ७·१८ लक्ष रु. उरले. सरकारनें ५ कोटी रु. वसूल भांडवलावर २½% डिव्हिडंडची हमी घेतलेली आहे, त्याप्रमाणें डिव्हिडंड देण्यास ११·२५ लक्ष रु. लागतील. परंतु कॉर्पोरेशनजवळ फक्त ७·१८ लक्ष रु. च आहेत. म्हणून, सरकारकडून ११·२५ – ७·१८ = ४·०६ लक्ष रु. घेऊन २½% डिव्हिडंड वाटण्यांत येईल. जून १९५२ अखेरच्या पहिल्या चार वर्षांत सरकारकडून अशाच रीतीनें एकूण २६·८९ लक्ष रु. घ्यावे लागले होते.

अहवालाचे वर्षी कॉर्पोरेशनकडे ९ कोटी रु. कर्ज मागणारे ४३ अर्ज दाखल झाले व ५·२७ कोटी रु. चे २९ अर्ज मंजूर करण्यांत आले. ह्यापूर्वीच्या वर्षी फक्त १·४३ कोटी रु. चे १४ अर्ज मंजूर करण्यांत आले होते. कॉर्पोरेशननें आजवर मंजूर केलेल्या २०·७४ कोटी रु. कर्जांपैकी कपास कापड गिरण्यांना ३·०७ कोटी रु.; रसायनांस २·४४ कोटी रु., सिमेंटला २·३५ कोटी रु., साखरेस २·०५ कोटी रु., कागदास २·०४ कोटी रु., कांचेस १·३५ कोटी रु., इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगला १·२९ कोटी रु., व लोखंड-पोलादास १·१२ कोटी रु. मिळाले. एकूण १३७ अर्ज मंजूर करण्यांत आले, त्यांची वर्गवारी अशी:— १० लक्ष रु. खालील ७८; १० ते ५० लक्ष रु. चे ५७; ९० लक्ष रु. चा १; १ कोटी रु. चा १.

कॉर्पोरेशनच्या स्थापनेपासून आतांपर्यंत एकूण १·४७ कोटी रु. व्याजाच्या पोटीं येणें होतें. त्यांपैकीं १·३४ कोटी रु. प्रत्यक्ष वसूल झाले. ९०·३० लक्ष रु. मुद्दल येणें होतें. त्यापैकीं ६१·४४ लक्ष रु. चे हप्ते वसूल झाले.

---

### रिझर्व्ह बँकेचा अहवाल

जून, १९५४ अखेरचा रिझर्व्ह बँकेचा अहवाल हिंदी आर्थिक संसाराची घडी सुधारली असल्याचें दर्शवितो. अन्नपरिस्थितींत सुधारणा घडून आली असून धान्याचे भाव उतरले आहेत. औद्योगिक उत्पादन वाढलें आहे आणि परराष्ट्रीय व्यापारांत ६० कोटी रुपयांची अनुकूल तफावत अनुभवास आली आहे. रिझर्व्ह बँकेची परदेशांतील गुंतवणूक ११ कोटी रुपयांनीं वाढली आहे. स्टॉक एक्सचेंजवरील औद्योगिक रोख्यांच्या किंमती चढीच्या राहिल्या व नवें भांडवल गुंतण्यासाठी पुढें येऊं लागलें. नोव्हेंबर १९५१ मध्यें रिझर्व्ह बँकेनें बिलमार्केट योजना सुरू केली, तिचा उद्देश बँकांनीं आपली कर्ज देण्याची शक्ति वाढविण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून सरकारी रोख्यांचे तारणावर कर्ज काढण्याऐवजीं बिलें रीडिस्कौंट करून रक्कम घ्यावी, असा आहे. १९५२ च्या मोसमांत रिझर्व्ह बँकेनें अशीं ७४ कोटी रुपयांचीं कर्जें दिलीं, १९५३ च्या मोसमांत त्यांची रक्कम ६१ कोटी रु. झाली आणि १९५४ मध्यें ती १२२ कोटी रु. वर गेली. पैशाला येणाऱ्या मागणीप्रमाणें बँकांचीं कर्जें वाढावींत व कमी व्हावींत आणि पतयोजनेस लवचीकपणा प्राप्त व्हावा, हा उद्देश सफळ होऊं लागला आहे आणि बिलमार्केट योजनेची व्याप्ति आतां आणखी थोडी वाढविण्यांत आली आहे.

रिझर्व्ह बँक शेतकऱ्यांस सहकारी बँकांकरवीं अधिकाधिक मदत करूं लागली आहे. सहकारी बँकांनीं मंजूर केलेल्या कर्जांची मर्यादा १९४६–४७ मध्यें ७ लक्ष रु. होती, ती १९४९–५० मध्यें २१४ लक्ष रु. झाली, १९५१–५२ मध्यें १,२४० लक्ष रु. झाली व १९५३–५४ मध्यें ती १,६३२ लक्ष रुपयांपर्यंत वाढली. रिझर्व्ह बँकेचा ग्रामीण भागांतील कर्जपुरवठ्याशीं अधिक निकटचा संबंध येऊं लागल्याचें तें निदर्शक आहे.

रिझर्व्ह बँकेचें बँकिंग क्षेत्रावरील नियंत्रण वाढत आहे. जून १९५४ अखेर रिझर्व्ह बँकेनें ५२० बँकांची तपासणी पुरी केली, त्यांपैकीं ११३ बँकांची तपासणी एकापेक्षा अधिक वेळां झाली. बँकांच्या कर्जविषयक धोरणांत सुसूत्रता आणण्याचा रिझर्व्ह बँकेचा प्रयत्न चालू आहे.


**राष्ट्रीय नियोजन कर्जांत**

**सढळ हातानें रक्कम गुंतवा.**

**हें कर्ज १६ सप्टेंबर १९५४ रोजीं बंद होईल.**

## मुंबई ग्रामोद्योग मंडळ स्थापन करण्यांत येणार

भारतीय संघराज्याच्या अध्यक्षांची मान्यता मिळाल्यावर १९५४ चा मुंबई ग्रामोद्योग कायदा मुंबई सरकारच्या ता. ३१ ऑगस्टच्या गॅझेटांत प्रसिद्ध झाला आहे.

मुंबई ग्रामोद्योग मंडळ या नांवाचें एक मंडळ कायद्यानें स्थापन करण्याची तरतूद या कायद्यांत करण्यांत आली आहे. ग्रामोद्योग सुरू करण्याची व त्यांची वाढ करण्याची जबाबदारी या मंडळावर राहील.

सध्यां ग्रामोद्योगाचा विकास करण्याचें कार्य ग्रामोद्योग समितीकडे सोंपविण्यांत आलें आहे.

कायद्यानें प्रस्थापित होणाऱ्या नव्या मंडळाचीं कामें पुढीलप्रमाणें असतील:—

( १ ) ग्रामोद्योग सुरू करणें, त्यांस उत्तेजन देणें, मदत करणें, चालू ठेवणें आणि ग्रामोद्योगाच्या मालाचा व्यापार करणें.

( २ ) लोकांना घरच्या घरीं काम पुरवून आणि पैशाची मदत देऊन त्यांना साहाय्य करणें.

( ३ ) ग्रामोद्योग सुरू करण्याच्या दृष्टीनें किंवा चालू ठेवण्याच्या दृष्टीनें लोकांना आवश्यक तें ज्ञान मिळावें म्हणून त्यांना शिक्षण देण्यासाठीं शिक्षणाचे वर्ग चालविणें.

( ४ ) ग्रामोद्योगासाठीं सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन देणें.

( ५ ) ( अ ) ग्रामीण उद्योगधंद्यांसाठीं लागणारीं अवजारें आणि माल तयार करणें.

( ब ) यासाठीं कच्चा माल, हत्यारें व अवजारें पुरविणें.

( क ) अशा उद्योगधंद्यांच्या मालाची विक्री करणें आणि विक्रीची व्यवस्था पाहणें.

( ६ ) स्टोअर्स, दुकानें उघडून किंवा प्रदर्शनें भरवून ग्रामोद्योगाच्या मालाची प्रसिद्धि करणें व त्यास लोकप्रियता मिळवून देणें.

( ७ ) लोकमत तयार करणें आणि ग्रामोद्योगाच्या मालास आश्रय दिल्यानें होणारे फायदे लोकांना पटवून देणें.

( ८ ) ग्रामोद्योगाच्या बाबतींत तज्ज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन मिळविणें.

( ९ ) ग्रामोद्योगासंबंधींचें संशोधन कार्य हातीं घेणें आणि अशा कार्यास उत्तेजन देणें आणि उपरोक्त कायद्याचा हेतु सफल करण्याच्या दृष्टीनें करावें लागणारें अशाच प्रकारचें इतर कार्य करणें.

( १० ) उपरोक्त कायद्याचा हेतु सफल करण्याच्या दृष्टीनें राज्य सरकार जीं सांगेल तीं कामें पार पाडणें.

---

### राणंद तलावांत १५,००० मासे सोडले

मुंबई सरकारनें राणंद (उत्तर सातारा) तलावांत सुमारे १५,००० मासे मुद्दाम आणून निपज करण्याकरतां सोडले आहेत. २१ जुलै रोजीं हे मासे सोडण्यांत आले. हे मासे गंगा नदींतील माशांच्या जातींचे असून ते कलकत्ता येथें तयार झाले आहेत. कलकत्त्याहून हे मासे विमानानें मुंबईस आणण्यांत आले व नंतर ते रेल्वेनें कोरेगांव पर्यंत नेण्यांत आल्यावर ट्रकनें ते राणंद तलावावर पोंचविण्यांत आले. गांवकऱ्यांनीं मोठ्या हौसेनें या माशांची गंगापासून तलावापर्यंत मिरवणूक काढली व मोठ्या समारंभानें हे मासे तलावांत सोडण्यांत आले. राणंद तलाव आतां तुडुंब भरला असून या ठिकाणीं हे मासे चांगले वाढतील, अशी अपेक्षा आहे.

## महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयांतील दोन नवे ग्रंथ

### मँचेस्टर चेंबर ऑफ कॉमर्स, १९५३–५४ ची डायरेक्टरी

राज्यारोहण संदर्भ ग्रंथ: मँचेस्टरचे लॉर्ड मेअॅर, यांची प्रस्तावना. छपाई फिलिप्स पार्क प्रेस, सी. निकोल्सन आणि कंपनी, लि. यांनीं केली आहे. बाइंडिंग कापडी आहे. लॉर्ड मेअॅर लिहितात कीं, मँचेस्टरवर मोठी जबाबदारी पडली आहे व हें ब्रिटन देशाचें मध्यकेन्द्र झालेलें आहे. चेंबरचे अध्यक्ष, बेंजामिन् पिकअप्, यांनीं उपोद्‌घात लिहिला असून त्यांत ग्रंथाचें व चेंबरचें महत्त्व सांगितलें आहे. मँचेस्टर चेंबर ऑफ कॉमर्स, या संस्थेच्या सभासदांची संख्या ५,००० चे वर आहे व या संस्थेवरून व्यापार–उद्योग–धंद्यांत चेंबरचें प्राबल्य केवढें आहे याची कल्पना सहज करतां येईल. या ग्रंथ–प्रकाशनाचें महत्त्व मँचेस्टर शहराचें शतसंवत्सर याच वेळीं असल्यानें अधिकच वाढलेलें आहे. मँचेस्टर चेंबर ही ३०० वर्षांची जुनी संस्था आहे. प्रगमनशील भरभराटीचें स्पष्ट चित्र या ग्रंथांत दिसून येतें. मँचेस्टर शहरांत जे प्रधान उद्योगधंदे व व्यवसाय वाढीला लागले आहेत त्यावरून शहराचा नांवलौकिक सर्वत्र पसरला आहे. सेवा आणि कर्तव्यकर्म यावरच चेंबरच्या महत्त्वाचा सर्व भर राहील हें संस्थेचें ब्रीदवाक्य सतत चालू राहील अशी ग्वाही ग्रंथकर्त्यांनीं सर्वत्रांस दिली आहे. ग्रंथाची पृष्ठसंख्या सुमारें ३०० चेवर आहे. व्यापार–उद्दीम–उद्योगधंदे–विषयक संदर्भ ग्रंथांत अनेक प्रकारचे असून व्यापारी व उद्योगधंद्यांत असलेल्या लोकांना पुस्तक अनेक प्रकारें उपयुक्त ठरणारें झालें आहे. हा ग्रंथ 'आंतरराष्ट्रीय–ग्रंथ–प्रदर्शनां'त कॉमनवेल्थ इमारतींत सार्वजनिक उपयोगासाठीं मांडून ठेविला आहे.

### दी कार्पेट अॅन्युअल्, १९५३

( पृष्ठसंख्या–३१४. छपाई–क्लेअर ओ मोलर्स, लि., सरे. )

जगांतील गालिच्यांच्या धंद्यासंबंधीं माहिती या ग्रंथांत प्रसिद्ध केलेली आहे. ब्रिटिश कॉन्टिनेन्टल ट्रेड प्रेस लि. लंडन, यांनीं पुस्तकाचें प्रकाशन केलें आहे. या पुस्तकांत युद्धोत्तर कालांत गेलें वर्ष जगांत बहुतेक देशांना व्यापारधंदा व उत्पादन या दृष्टीनें फलदायक झालेलें दाखविलें आहे. गालिच्यांचे ऐवजीं जमिनीवर घालावयाच्या सतरंज्या व इतर विणकामें नवीन नवीन निघत आहेत व गालिचे करणारांना या इतर उत्पादनाला तोंड देऊन झगडावें लागत आहे व त्यांची स्पर्धा त्यांना जाणवत आहे. यासाठीं नवीन विणकर, नवीन रंग, नवीन नवीन नमुने शोधून काढावे लागत आहेत. युद्धोत्तर काळांत या धंद्याच्या उत्पादनांत महत्त्वाचे फेरफार घडवून आणिले पाहिजेत, ही गोष्ट फारच थोड्या कारखानदारांचे ध्यानांत आली आहे.

इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, बेल्जम्, कॅनडा, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इटली, हिंदुस्थान, इराण या देशांत गालिचे तयार होत असतात आणि गालिच्यांचा व्यापार सर्व जगांत चालतो व कित्येक कारखानदारांचे व्यापार लंडन येथील केंद्रांतून चालतात. अमेरिकेंत १९५२ सालीं १० लक्ष चौ. वार गालिचे तयार झाले. अशाच गालिचे करणाऱ्या देशांचेबद्दल माहिती या पुस्तकांत दिलेली आहे. गालिचे विणावयास लागणारी लोकर कोठें मिळते याचेहि संदर्भ अनेक आहेत व ते उपयुक्त आहेत. गालिच्यांच्या कामांत लोकरीऐवजीं कृत्रिम धाग्याचाहि शिरकाव झालेला आहे. या ग्रंथांत संदर्भासाठीं मुख्यत: सात विभाग, धंद्यांतील वर्गवारीवरून करण्यांत आले आहेत.

हें पुस्तक महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या ग्रंथालयांत कोणासहि पहावयास मिळेल.

## भूमिगत धनाचा शोध

भूमींत पुरलेल्या धनाचा शोध ठावण्याचें कार्य सध्यां लखनौ शहराच्या परिसरांत चाललेलें आहे. औधच्या गादीचा ८० वर्षे वयाचा वारस ह्या कामीं कसून खटपट करीत आहे. ह्या गृहस्थाचें नांव असीफ मिरझा असें असून शेवटचा मोगल बादशहा शहा आलम ह्याचे आपण पणतु असल्याचें तो सांगतो. १८५७ सालच्या 'बंडाच्या' वेळीं लखनौ शहराच्या आसपास कोट्यावधि रुपयांचें धन पुरण्यांत आलें आहे, अशी माहिती मिरझा ह्याला त्याच्या वडिलांनीं सांगितली होती. पण ही माहिती ब्रिटिशांचें राज्य गेल्यावर उघड करण्यांत यावी आणि नंतरच प्रत्यक्ष उत्खननास सुरुवात करावी अशी सूचनाहि त्याला देण्यांत आली होती. ह्या गुप्तधनाच्या सांठ्यांत हिरे–माणकांचे मौल्यवान खडे तर आहेतच; पण प्रत्येकी १ तोळा वजनाच्या १ लाख मोहराहि असल्याची त्याची माहिती आहे. आपल्या बापानें दिलेली गुप्त माहिती आपण बाहेर फोडली तर उत्तर–प्रदेश सरकार सर्वच धनावर आपला हक्क सांगेल अशी भीति त्याला वाटत होती. पण आतां खुद्द उत्तर–प्रदेश सरकारनेंच असीफ मिरझा ह्याच्याशीं भागीदारीचा करार केल्याचें समजतें. कराराप्रमाणें असीफ मिरजा ह्यांनीं धनासाठी करावयाच्या खोदकामाचा खर्च करावयाचा असून धन सांपडल्यास त्यापैकीं ५० टक्के भाग राज्य-सरकारला द्यावयाचा आहे. असीफ मिरझा ह्याला यश आलें तर आणखीहि कांहीं ठिकाणीं गुप्त धनाचा शोध लावण्याच काम सुरू होण्याचा संभव आहे. ब्रिटिश राजवटीनें मागील शतकांत एका मागोमाग एक राजांना पदच्युत करण्याचा सपाटा चालविला होता. त्यावेळीं अनेक संस्थानिकांनीं आपल्या जवळचे धन जमिनींत पुरून टाकलें, असा प्रवाद आहे. ही माहिती खरी असेल तर निरनिराळ्या राज्य सरकारांना आपली तिजोरी भरण्याचा एक नवीनच मार्ग सांपडला असें म्हणतां येईल.

## घाऊक मालाच्या किंमतींचा इंडेक्स नंबर

| | अन्न | औद्योगिक कच्चा माल | अर्ध–पक्का माल | तयार माल | इतर | सर्व जिनसा |
|---|---|---|---|---|---|---|
| ऑगस्ट १९३९ असेरचें वर्ष = १०० | | | | | | |
| १९४९सरासरी | ३८९ | ४६४ | ३२८ | ३४४ | ५४६ | ३८१·१ |
| १९५० „ | ४१० | ५०३ | ३४१ | ३४८ | ६८३ | ४००·७ |
| १९५१ „ | ४१० | ६०८ | ३७८ | ३९६ | ७३० | ४३९·३ |
| १९५२ „ | ३६० | ४५४ | ३४७ | ३७८ | ६३६ | ३८६·९ |
| १९५३ „ | ३८१ | ४६० | ३५६ | ३६७ | ६६२ | ३९३·९ |
| १९५३ जुलै | ४०६ | ४८१ | ३६५ | ३६७ | ६९९ | ४०७·७ |
| ऑ. | ४०७ | ४८९ | ३६५ | ३७१ | ७०६ | ४१०४ |
| सप्टें. | ३९९ | ४७५ | ३६४ | ३६४ | ७१७ | ४०३·८ |
| ऑक्टो. | ३८६ | ४४८ | ३५३ | ३६५ | ७२२ | ३९३·६ |
| नोव्हें. | ३७८ | ४४१ | ३५६ | ३६६ | ७१५ | ३९०·६ |
| डिसें. | ३६७ | ४५९ | ३५७ | ३६४ | ७१२ | ३८९·४ |
| १९५४ जाने. | ३८२ | ४८१ | ३६२ | ३६४ | ७१० | ३९८·५ |
| फेब्रु. | ३७३ | ४७१ | ३६० | ३६८ | ६९४ | ३९५·० |
| मार्च | ३७१ | ४६३ | ३५६ | ३७४ | ६८७ | ३९४·० |
| एप्रिल | ३८२ | ४७२ | ३६२ | ३८१ | ७०७ | ४०२·६ |
| मे | ३६६ | ४६५ | ३६३ | ३८१ | ६९० | ३९६·१ |
| जून | ३४३ | ४४१ | ३५६ | ३७९ | ६४७ | ३८१·६ |

## मुंबई राज्यांतील शेतांची पाहणी

मुंबई राज्यांतील शेतजमिनींची नमुना पाहणी करण्याचें काम मुंबई सरकारच्या ब्यूरो ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड स्टॅटिस्टिक्सतर्फे सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत हातीं घेण्यांत आलें आहे. राज्यांतील निरनिराळ्या आकारांच्या शेतांची संख्या अजमावणें आणि विशिष्ट आकाराच्या एका गटाबाबत पुढील तपशील गोळा करणें हा या पाहणीचा हेतु आहे. (१) जमिनीचा उपयोग, (२) पाणीपुरवठा, (३) जमीन-धारापद्धत व कुळवहिवाट. (४) गुरांची संख्या, शेतकीचीं अवजारें. तसेंच शेती व पशुसंवर्धन यांतील प्रमाण, शेताची व्यवस्था, घरगुती कर्जबाजारीपणा व शेतीच्या पद्धती यांसंबंधीचीहि माहिती गोळा करण्यांत येईल.

ही माहिती म्हणजे यूनोच्या अन्न व शेतकी संघटनेतर्फे हातीं घेण्यांत आलेल्या जागतिक शेतीविषयक शिरगणतीचाच एक भाग आहे. अशी पाहणी भारत सरकारतर्फे सबंध भारतांत करण्यांत येत आहे. मुंबई राज्यांत हें काम निवडक अशा ४३२ गांवांत करण्यांत येईल व त्यांपैकी २८८ गांवांत सदरहू ब्यूरोतर्फे व उरलेल्या गांवांत भारत सरकारतर्फे करण्यांत येईल.

## पाकिस्तानांत फक्त ७·३% लोक उर्दू बोलतात

पाकिस्तानी पार्लमेंटांत एका प्रश्नास उत्तर देतांना मंत्र्यांनीं सांगितलें कीं, पाकिस्तानांतील फक्त ७·३% प्रजाजन उर्दू बोलतात. इतर भाषिकांचें प्रमाण त्यांनीं खालीलप्रमाणें दिलें:— बंगाली ५६%, पंजाबी २९%, सिंधी ५·९%, पुश्तु ४·९%, इंग्रजी १·९% व अरेबिक ०·१%. अशा परिस्थितींत, उर्दू व बंगाली ह्याच पाकिस्तानच्या राष्ट्र–भाषा कशा असा प्रश्न मनांत येतो.


# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३०] **बेळगांव** [शेड्यूल्ड बँक

**दक्षिण महाराष्ट्रांतील व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

शाखा:—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, वेंगुर्लें, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिक्कोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती व जयसिंगपूर.

**वसूल भांडवल रु. ६,००,०००**

**रिझर्व्ह व इतर फंड्स रु. २,१७,०००**

**ठेवी रु. ८८,००,००० चे वर**

**एकूण खेळतें भांडवल रु. १,०८,००,००० चे वर**

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्ट-मधील लॉकरचे दर लोकांचे सोयीकरितां खास कमी केले आहेत. तरी सर्वांनीं एक वेळ व्हॉल्टला भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

## ब्रिटनमधील लोक सिनेमाचे शोकी

संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या शिक्षण–शास्त्र–सांस्कृतिक शाखेनें एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. ह्या अहवालावरून असें दिसून येतें कीं, ब्रिटनमधील लोक इतर देशांतील लोकांच्या मानानें अधिक सिनेमा पाहतात आणि अधिक वृत्तपत्रें वाचतात. १९५३ सालीं सामान्य ब्रिटिश नागरिकानें निदान दर पंधरवड्याला तरी एक सिनेमा पाहिला. कॅनडांतील नागरिक मात्र महिन्यांतून एकदांच सिनेमा पाहण्यास गेला. १९५३ सालीं ब्रिटनमधील दर हजार माणसामागें ६१५ जण दैनिक वृत्तपत्रें वाचणारे होते, असें आढळून आलें. ह्याच्या उलट, इतर कांहीं देशांतून वृत्तपत्र वाचणाऱ्यांचें प्रमाण दर हजारीं एक, इतकें कमी आहे. पुस्तकांच्या प्रकाशनाच्या बाबतींतहि ब्रिटनचा नंबर पहिला लागला. गेल्या वर्षी ब्रिटनमध्यें १३,१५० नवीं पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत आलीं. प. जर्मनींत १०,३५६ नवे ग्रंथ प्रकाशित करण्यांत आले आणि अमेरिकेंत ९,३९९ पुस्तकें नव्यानें प्रकाशित झालीं. ब्रिटनमधील टेलिव्हिजनच्या संख्येंतहि ७० टक्क्यांनीं वाढ झाल्याचें दिसून आलें. आतां ब्रिटनमध्यें २९,००,००० टेलेसेटस् आहेत. अमेरिकेंत २,५१,००,००० सेटस आहेत. गेल्या वर्षी अमेरिकेंतील टेलेसेटस्‌ची संख्या ४० टक्क्यांनीं वाढली. जगांत १४ वर्षे वयाच्या पुढील जी लोकसंख्या आहे त्यांपैकीं ४५ ते ५५ टक्के लोक निरक्षर आहेत. आफ्रिकेंत ७५ ते ८५ टक्के लोक निरक्षर आहेत. उत्तर–अमेरिकेंत १० ते १५ टक्के लोक निरक्षर आहेत आणि युरोपांत ५ ते १० टक्के लोक निरक्षर आहेत. युरोपांतील निरक्षरांच्या टक्केवारींत रशिआचा विचार करण्यांत आलेला नाहीं.

## कर्नाटकाला विजेचा पुरवठा

मुंबई राज्य आणि म्हैसूर राज्य ह्यांच्या सीमेवर सुप्रसिद्ध जोग धबधबा आहे. ह्या धबधब्याचा उपयोग करून विजेची निर्मिति करण्याची योजना आंखण्यांत आलेली आहे. विजेच्या वाटप–योजनेला आतां मुंबई सरकारची मान्यता मिळालेली आहे. त्यामुळें आतां ती योजना मार्गाला लागण्याची शक्यता वाढलेली आहे. म्हैसूर सरकारनें ११,५०० किलोवॅट वीज कर्नाटक राज्याला पुरविण्याचें कबूल केलें आहे. अर्थात् म्हैसूर राज्याला लागून असलेल्या भागालाच ह्या पुरवठ्याचा उपयोग होणार आहे. विजेचा उपयोग शेतीसाठी आणि छोटे ग्रामोद्योग काढण्यासाठी करण्यांत येणार आहे. मुंबई–राज्यानें आपला म्हणून जो पहिला पंचवार्षिक कार्यक्रम आंखला आहे त्यांत उपलब्ध होणाऱ्या विजेचा पुरवठा वांटण्यासाठी योजना सादर करण्यांत आलेली आहे. वांटपाची व्यवस्था करण्यासाठी २१३ लाख रुपये मंजूर करण्यांत आलेले होते. विजेच्या वहनासाठी तारा टाकण्याचें काम पूर्ण होत आलेलें असून पुरवठा लवकरच चालू होईल अशी अपेक्षा आहे. सरकारकडून परवाना घेणाऱ्या कंपन्यांना, त्याचप्रमाणें मध्यम आणि छोट्या उद्योगधंद्यांना म्हैसूर सरकारकडून मिळणाऱ्या विजेंत अंशभागी होतां येईल. धारवाड, हुबळी, गदग, राणीबेन्नूर, इत्यादि भागांत आलीकडे छोटे उद्योगधंदे निघूं लागले असून त्यांना विजेच्या पुरवठ्याची फार जरूर आहे. मुंबई राज्यांतील छोट्या उद्योगधंद्यांना बऱ्याच ठिकाणीं औद्योगिक शक्तीची उणीव भासते. म्हैसूर आणि मुंबई राज्य ह्यांच्या दरम्यान सहकार्य झाल्यामुळें कर्नाटकाच्या म्हैसूरला लागून असलेल्या भागांत तरी विजेच्या पुरवठ्याचा प्रश्न सुटला असें म्हणतां येईल.

## हॉटेल व रेस्टॉरंटमधील कामगारांची किमान रोजंदारी

मुंबई राज्यांतील निवासाचीं हॉटेलें, रेस्टॉरंटें आणि खानावळी यांतील कामगारांची १९४८ च्या किमान रोजंदारीबाबतच्या कायद्याखालीं किमान रोजंदारी ठरविण्याच्या बाबतींत चौकशी करून सरकारला सल्ला देण्यासाठीं मुंबई सरकारनें, सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज श्री. आर. डी. शिंदे यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली आहे.

या समितीचे इतर सभासद पुढीलप्रमाणें आहेतः—

**मालकांचे प्रतिनिधीः**—श्री. बी. व्ही. तांबे, जे. पी. मुंबई; आणि श्री. ईश्वरभाई बी. पटेल, अहमदाबाद.

**कामगारांचे प्रतिनिधीः**—श्री. एम्. जाफर, अध्यक्ष मुंबई हॉटेल कामगार युनियन, मुंबई ४ आणि श्री. एन्. व्ही. सावंत, जनरल सेक्रेटरी ग्रेटर बॉम्बे हॉटेल कामगार युनियन, परेळ, मुंबई १२.

समितीनें आपला अहवाल सहा महिन्यांच्या आंत सादर करावा, असें तिला सांगण्यांत आलें आहे.

## यांत्रिक साहाय्यानें केलेल्या विड्यांवर जकात

यांत्रिक साहाय्यानें केलेल्या विड्यांवर दर हजारीं ३ रु. जकात बसविणाऱ्या ऑर्डिनन्सची जागा घेणाऱ्या कायद्याचा मसुदा लोकसभेंत मांडण्यांत आला आहे.

## महाराष्ट्रांतील लहान व मध्यम उद्योगधंद्यांच्या चालकांची परिषद

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या विद्यमानें महाराष्ट्रांतील लहान व मध्यम उद्योगधंद्यांच्या प्रतिनिधींची एक परिषद् बोलावण्यांत आली असून या परिषदेचें पहिलें अधिवेशन रविवार दि. २६ सप्टेंबर १९५४ रोजीं सकाळीं ८॥ वा. चेंबरच्या ओगले सभागृहांत भरणार आहे. मुंबई राज्याचे उद्योगमंत्री ना. डॉ. जीवराज मेहता यांनीं परिषदेचें उद्‌घाटन करण्याचें मान्य केलें आहे.


धी बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

# जाहीर खबर

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ४३ वी वार्षिक साधारण सभा शनिवार दिनांक २५ सप्टेंबर १९५४ रोजीं दुपारीं २ वाजतां ( स्टँ. टा. ) बँकेच्या रजिस्टर्ड कचेरींत ( सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग, ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई. ) खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

१. ३० जून १९५४ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले ताळेबंद, नफातोटा पत्रक व संचालक मंडळाचा अहवाल स्वीकारणें.

२. नफावांटणीचा दर जाहीर करणें.

३. हिशेबतपासनिसांची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणें.

मुंबई,
१ सप्टेंबर १९५४

संचालक मंडळाच्या हुकुमावरून,
वाय्. बी. गायतोंडे,
मॅनेजर.

भागांच्या तबदिलीचें काम ( ट्रान्सफर बुकें ) ता. १३–९–१९५४ ते २५–९–१९५४ पर्यंत ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहील. डिव्हिडंड मंजूर झाल्यास ता. ११–९–१९५४ रोजीं रजिस्टरमध्यें ज्या भागीदारांचीं नांवें दाखल झालेलीं असतील त्यांना सोमवार ता. ११ ऑक्टोबर १९५४ पासून मुंबई ऑफिसमध्यें त्याची रक्कम मिळूं लागेल.

# भारतीय उद्योगधंद्यांचें दिव्य, भव्य व सम्यग्दर्शन

## (१)

लेखकः—श्री. द. बा. बर्वे, बी. ए.

मुंबईस ' कॉमर्स ' नांवाचें इंग्रजी साप्ताहिक निघतें. ब्रिटिश राजवटींत सन १९१० सालीं ब्रिटिश व्यापारी कंपन्यांच्या प्रेरणेनें हें साप्ताहिक काढण्यांत आलें. दर डिसेंबर महिन्यांत म्हणजे नाताळांत या साप्ताहिकाचा वार्षिक अंक काढण्यांत येतो. याचा आकार दिवाळींत महाराष्ट्रांत जे मासिकांचे दिवाळी अंक निघतात त्याच्या आकाराच्या दुपटी-तिपटीनें मोठा असतो. अंक दोनशें पानांच्यावर असून वापरलेला कागद ग्लेझ व खूपच जाड असल्यामुळें या अंकाचें वजन जवळजवळ एक शेर इतकें असतें. या अंकांतील जाहिराती भारतांतील अव्वल दर्जाच्या उद्योगधंद्यांच्या असून त्यांची संख्या दोनशें सव्वादोनशें इतकी असते. यांत प्रसिद्ध होणारे लेख नामांकित व त्या त्या विषयांतील तज्ज्ञांचे प्रचलित उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें महत्त्वाच्या विषयावर लिहिलेले असतात. एका अंकाची किंमत साडेसात रुपये असते. या अंकांत भारतांतील सर्व महत्त्वाच्या उद्योग-धंद्यांची अद्ययावत् आंकडेवार माहिती दिलेली असते. उद्योग-धंद्यांबद्दल ज्यांना जिज्ञासा आहे अशा महाराष्ट्रीय वाचकांनीं या अंकाचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यास जगाच्या दृष्टीनें आपला भारत देश कोणच्या पायरीवर आहे व त्याला अद्याप आपली आर्थिक भरभराट करण्याच्या दृष्टीनें केवढा मोठा पल्ला गांठावयाचा आहे, त्याकरतां त्याच्यापुढें किती अडचणींचा डोंगर उभा आहे, तसेंच आपला महाराष्ट्र प्रांत उद्योगधंद्यांत भारतांत कोठेंसा आहे, भारतांतलि उद्योगपती व लक्ष्मीचे उपासक यांच्या हालचाली कशा प्रकारच्या आहेत, याची मूर्तिमंत कल्पना डोळ्यापुढें येते.

' कॉमर्स ' या अंकांत वर्णिलेल्या विषयाबाबत व त्यामध्यें प्रसिद्ध झालेल्या माहितीबद्दल, तसेच त्या अंकांतील जाहिरात देणाऱ्या कांहीं व्यापारी कंपन्यांच्या प्रचंड उलाढालीबद्दल संक्षेपानें अवश्य ती उपयुक्त माहिती वाचकांना कळावी म्हणून पुढें क्रमानें देत आहोंत.


पहिली गोष्ट, बहुतेक लेखांत आलेली म्हणजे भारत सरकारनें अंमलांत आणलेली **पंचवार्षिक योजना** हिचा उल्लेख नाहीं, असा एकहि लेख नाहीं. या पंचवार्षिक योजनेनें आर्थिक क्षेत्रांत द्विदल पद्धति निर्माण केली आहे. या योजनेंत दोन विभाग आहेत. एक पब्लिक सेक्टॉर व दुसरा प्रायव्हेट सेक्टॉर. सेक्टॉर म्हणजे विभाग. पहिला पब्लिक सेक्टॉर हा सर्वस्वीं भारत सरकारच्या नेतृत्वाखालीं चालणार असून दुसरा प्रायव्हेट सेक्टॉर हा सर्वस्वीं भारतांतील खाजगी उद्योगपतींनीं व कंपन्यांनीं चालवावयाचा आहे. जवळजवळ बाविसशें ते तेविसशें कोट रुपये या पंचवार्षिक योजनेकरतां सरकारला उभे करावयाचे असल्यामुळें ही दुर्घट गोष्ट साधण्याकरतां भारत सरकार आपली सत्ता, आपली पत व आपली सरकारी नियंत्रणा त्या कामीं राबवीत आहे. **जवळजवळ अडीच हजार कोटी रुपयांची एक लिमिटेड कंपनीच भारत सरकारनें काढली** असून त्याकरतां प्रांतिक सरकारांचें सर्व प्रकारचें साहाय्य मध्य-वर्ती सरकार घेत आहे. ही रक्कम मंदीच्या काळांत उभी करणें कांहीं लहान सहान काम नाहीं. एक प्रकारच्या पिळवणुकीच्या मार्गानें हा पैसा उभा करण्याचे भगीरथ प्रयत्न भारत सरकार करीत असल्यामुळें आपल्या देशांतील उद्योगपतींची दाणादाण उडाल्यासारखी स्थिति सध्यां झाली आहे; शिवाय वरील प्रचंड भांडवलाच्या जोरावर अनेक उद्योगधंदे राष्ट्रीय उपयुक्ततेच्या नांवावर आपल्या पदराखालीं केव्हां सरकार घेईल याचाहि नेम नसल्यामुळें तर आपले व्यापाराच्या आघाडीवर असलेले नेते बेचैन झालेले दिसतात. दिल्लीला भारतीय औद्योगिक व व्यापार-विषयक संस्थांची मध्यवर्ती संस्था आहे. तिचें नांव **फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स** व कलकत्त्याला भारतांत अद्यापि पाय रोवून बसलेल्या युरोपियन व्यापाऱ्यांच्या चेंबर्स यांची **असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स नांवाची मध्यवर्ती संस्था** आहे. या दोन्ही मध्यवर्ती चेंबर्स यांनीं सध्यां टाहो फोडण्यास सुरुवात केली आहे कीं, भारत सरकार आपल्या हातांत असलेल्या सत्तेचा एक प्रकारचा दुरुपयोग करून **निर-निराळीं नियंत्रणें** उद्योगधंद्यांवर घालीत आहे, आयात निर्यात व्यापारावर जकात बसवीत आहे, मजुरांना अनुकूल असे कायदे करीत आहे ही फार अनिष्ट गोष्ट आहे. **कोठला उद्योगधंदा सरकार आपल्या ताब्यांत केव्हां घेईल याचा मुळींच नेम नाहीं.** ब्रिटन-सत्ता सोडून गेलें असलें तरी त्यांच्या व्यापारी पेढ्या कलकत्त्याला मोठ्या प्रमाणावर अद्याप दबा धरून बसल्या असून त्यांनीं आपल्या कंपन्यांचीं नांवें भराभर 'बदलून' भारतीय हें विशेषण आपल्या कंपन्यांना चिकटवून वेश व नांव बदलून दंड थोपटून त्या भारतीय कंपन्यांना सामना देण्यास अद्याप उभ्या आहेत. ज्या विषयांत त्यांचें व भारतीय उद्योगधंदेवाल्यांचे हितसंबंध निगडित आहेत, त्या विषयांबाबत एकमेकांच्या हातांत हात घालून सरकारपुढें उभयतां आपलें अडचणींचें रडगाणें गातांना त्या दिसतात; आतां त्यांच्यामागें ब्रिटिश सरकारच्या सत्तेचा आधार नसल्यामुळें त्यांची स्थिति फार केविलवाणी झालेली आहे. सरकारच्या हुकुमानें परकीय नोकरवर्ग त्यांना काढून टाकणें भाग पडलें आहे !

या अंकांत एका लेखकानें म्हटलें आहे कीं, **ज्याप्रमाणें गोरक्षणाची चळवळ भारतांत चालू आहे, त्याप्रमाणें भारतां-तील खाजगी उद्योगधंद्यांना गोमाता समजून** त्यांचें संगोपन करावें. त्या दुभत्या गाई आहेत. त्यांच्या चाऱ्या–पाण्याची व्यवस्था करावी. हा लेखक म्हणतो : सध्यां राजकारण अर्थ-कारणाची गळचेपी करूं लागलें आहे. जे उद्योग राष्ट्रांत संपत्ति निर्माण करीत आहेत व बेकारांना काम देत आहेत त्यांना नाम-शेष करण्यास सरकार प्रवृत्त झालें आहे. ते मिळवीत असलेल्या ' नफ्या ' बद्दल सरकार त्यांची निंदा करीत आहे. वास्तविक या नफ्यांतूनच सरकारला कर मिळत असतो व कराच्या साहाय्यानेंच हें सरकार राज्य चालवीत आहे व राजकीय पुढारी सभा गाजवीत आहेत. **तुम्हीं नफ्याला नांवें ठेवतां** परंतु तुम्हीं सत्ताधीश होण्याकरतां शुभाशुभ उपायानें जीं ' मतें ' सत्तेकरतां मिळवितां त्या मतांची कोणी निंदा केल्यास तुम्हांला बरें वाटेल काय ? तात्पर्य, सोन्याचें अंडें देणाऱ्या या खाजगी उद्योगधंदेरूपी कोंब-ड्यांचा नाश करण्यास तुम्हीं प्रवृत्त होऊं नका, असा या लेखकानें सरकारला कळकळीचा सल्ला दिला आहे. (अपूर्ण)

---

### दि इन्व्हेस्ट अंडररायटर्स असोसिएशन ऑफ इंडिया

भांडवल " अंडरराइट " करणाऱ्या कांहीं प्रमुख अंडररायटर्सची सभा मुंबईमध्यें भरली, तिचेमध्यें वरील नांवाची अखिल भारतीय स्वरूपाची संस्था स्थापण्याचें ठरलें.



## हो, ही योजना माझ्यासाठींच आहे !

हजारों खेडयांतून विजेचे दिवे लागतील. हातमागांचे आवाज येऊं लागतील व चरक फिरूं लागतील. कामगारांचा प्रत्येक लहान गट वाढत्या ग्रामोद्योगाचें केन्द्र होईल. प्रत्येकाला काम मिळेल. व कोणीहि बेकार राहणार नाहीं. पंचवार्षिक योजनेमध्ये आपलीं विद्युत् शक्ति निर्माण करण्याचीं साधनें सुधारण्यासाठीं व वाढविण्यासाठीं १२७ कोट रूपये खर्च करण्याची तरतूद केली आहे. नानाविध उद्दिष्ट असलेल्या हायड्रो-इलेक्ट्रिक योजनांमुळें उद्योगधंद्यांना स्वस्त दरांत वीज पुरविणें शक्य होईल. जगांतील पुढारलेल्या राष्ट्रांत स्थान मिळविण्याचा आपल्या राष्ट्रानें केलेल्या निश्चयाचा हा पुरावा आहे.

लाखो टन पोलाद पंचवार्षिक नियोजनांतील विविध योजना अमलांत आणण्यासाठीं वापरलें जाईल. आणि म्हणूनच, आपल्या राष्ट्राच्या व लोकांच्या अधिक सुसंपन्न व फलदायी भविष्याचा पाया घालण्यांत पोलाद अनेक महत्त्वपूर्ण त-हेनें उपयोगी पडेल

दी टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लिमिटेड

TN 3933

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.